प्रेस नोट

जा.क्र. २०९ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः– २२/०४/२०१८

# पोलीस स्टेशन तुमसरची कारवाई /दारू अड्यावर धाडी

भंडारा– दिनांक २२/०४/२०१८ ला आम्ही पोलीस निरीक्षक सुधाकर चव्हाण सा. सोबत पोलीस उपनिरीक्षक सदीपान उबाळे, पोहवा. माहुर्ले/७४३, पोका. गाढवे/११७२ असे मोटार सायकलने प्रोव्हीसन रेड कामी, साखळी गावाकडे रवाना झालो असता, गुप्त माहीती दाराकडुन माहीती मिळाली की, नामे ओमप्रकाश रामचंद्र हरदे वय ३० वर्ष रा. मरार साखळी ता. तुमसर यांच्या मरार साखळी नाल्यातील पाण्यात पॉलीथीन मध्ये सडवा मोहा पास टाकलेला आहे. अशी गुप्त बातमी मिळाल्याने, पोलीस निरीक्षक सुधाकर चव्हाण, सोबत पोलीस स्टॉप असे मरार साखळी गावात गेले तेथे पंच नामे १) भोजराज झिंगा पटले वय ४९ वर्ष रा. मरार साखळी ता. तुमसर २) राजेश रामलाल बाहे वय ४२ वर्ष सामाजीक कार्यकर्ता मरार साखळी ता. तुमसर यांना सदर घटणे बाबत लेखी सुचना देवुन पंचासह मरार साखळी नाल्याकडे गेलो असता तेथे ३ इसम मिळुन आले, त्यांना पंचासमक्ष त्याचे नाव गाव विचाराले असता त्यांनी आपले नाव १) ओमप्रकाश रामचंद्र हरदे वय ३० वर्ष रा. मरार साखळी २) प्रदीप हरीचद्र हरदे वय २३ वर्ष रा. मरार साखळी ३) कैलाश सुखराम ठाकरे वय २२ वर्ष रा. मिटेवानी असे सागिंतले.

सदर मरार साखळी नाल्याची पाहणी केली असता, नाल्याच्या कडेला पाण्यात १) ६० प्लॅस्टीक पॉलीथीन मध्ये सडवा मोहा पास भरलेला होता, सदर प्लॅस्टीक पॉलीथीनची बारकाहीने पाहणी केली असता, सदर प्लॅस्टीक पॉलीथीन मध्ये सडवा मोहा पास प्रत्येकी १५ किलो असे एकुण ९०० किलो किमती अंदाजे ४५,०००/रु. व नाल्याच्या शेजारी २) १०० किलो गुड अंदाजे २८,००/रु. चा ३) १ हिरो होंडा पॅशन गाडी क्र. एमएच ३२ एच ६४०६ किमती ४०,०००/रु असा एकुन ८७,८००/रु. चा माल मिळुन आला. तसा मौका जप्ती पंचनामा पंचासमक्ष सविस्तर तयार केला व जप्ती सिए.माल ताब्यात घेतले, तसेच होन्डा पॅशन गाडी क्र. एमएच ३२ एच ६४०६ तसेच आरोपी ताब्यात घेतले, व पोलीस उपनिरीक्षक सदीपान उबाळे पो.स्टे तुमसर यांचे फिर्याद वरून अप क्र. २०३/१८ कलम ६५(फ) मदाका. अन्वये गुन्हा नोद केला. व सदर तिन्ही आरोपीतांना अटक रण्यात आली असुन पुढील तपास पोहवा रमेश माहुर्ले/७४३ हे करीत आहेत.

Chouhan AS2468

**( .एस.के.चव्हाण)**
**पोलीस नीरीक्षक तुमसर**
**दुरध्वनी क्र. ९८२३६४७०६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.